Adv. Dhananjay Bhonsale
President

Shailesh Tilak
General Secretary

MAHARASHTRA JUDO
ASSOCIATION
महाराष्ट्र ज्युदो संघटना

Affiliated to Judo Fedration of India & Maharashtra Olympic Association
Trust Registration Number: F-3967 Mumbai

568, Narayan Peth, Tilak Wada, Pune- 411 030; gs.mahajudo@gmail.com; +91-94220 29656

01.04.2022, पुणे



मा. अध्यक्ष / सचिव,
संलग्न आणि निमंत्रित जिल्हा ज्यूदो संघटना

**हिंदू नववर्ष दिन अर्थात गुढी पाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !**

विषय: 48 व्या ज्युनियर्स (मुले व मुली) राज्य ज्यूदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा, पुणे- 2022

महोदय / महोदया,

कळविण्यास आनंद होतो की 48 व्या ज्युनियर्स (मुले आणि मुली) खुली राज्यस्तरिय ज्यूदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा-2022, श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या स्पर्धांच्या राष्ट्रीय स्पर्धा बहुधा ज्यूदो फेडरेशन ऑफ इंडियातर्फे मे 2022 मध्ये आयोजिल्या जाण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनतर्फे आयोजित 48 व्या राज्य ज्युनियर्स स्पर्धेचा तपशील खालील प्रमाणे;

**1) स्पर्धेचा कालावधी**: दि. 22, 23 आणि 24 एप्रिल 2022 (शुक्रवार, शनिवार व रविवार)

**2) स्पर्धेचे ठिकाण**: बॅडमिंटन हॉल, श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे.

**3) स्पर्धेचे वेळापत्रक**:

| | |
|---|---|
| **दिनांक 22 एप्रिल 2022, शुक्रवार** | **मुले -खेळाडुंचे दुपारी 12.00 वाजेपर्यंत आगमन, रजिस्ट्रेशन आणि वजने** |
| | **व्यवस्थापक / प्रशिक्षक मिटिंग आणि ड्रॉज- दु. 2.00 वाजता; त्यानंतर नव्या नियमांची माहिती आणि लगेचच मुले स्पर्धाप्रारंभ** |
| **दिनांक 23 एप्रिल 2022, शनिवार** | **उर्वरित मुले स्पर्धा** |
| | **मुली - खेळाडुंचे दुपारी 12.00 वाजेपर्यंत आगमन, रजिस्ट्रेशन आणि वजने** |
| | **व्यवस्थापक / प्रशिक्षक मिटिंग आणि ड्रॉज- दु. 4.00 वाजता; त्यानंतर नव्या नियमांची माहिती आणि लगेचच मुली स्पर्धाप्रारंभ** |
| **दिनांक 24 एप्रिल 2022, शनिवार** | **उर्वरित मुली स्पर्धा** |

**सर्व सचिवांना विनंती आहे की वेळेचे आणि स्पर्धांचे वेळापत्रक आणि हातातील असलेला वेळ लक्षात घेता आपल्या संघाच्या प्रवासाचे नियोजन तसे आखावे आणि मुले आणि मुली संघांना स्पर्धास्थानी नेमून दिलेल्या दिवशी आणि त्याच वेळेवर उपस्थित रहाण्याच्या सूचना द्याव्या.**

**कोणीही महिला संघ खेळाडूने दि. 22 एप्रिल 2022 रोजी स्पर्धास्थानी येवू नये.**
**मुले खेळाडूंच्या संघांनी 23 एप्रिल 2022 रोजी स्पर्धापश्चात रहाण्याची जागा लगेचच रिकामी केली पाहिजे.**

